मराठी व इंग्रजी कॉम्प्युटर टायपिंग
शासकीय-निमशासकीय कार्यालयातील कोणत्याही पदाच्या नोकरीसाठी उपयुक्त नव्हे तर अनिवार्य असा MPSC च्या सर्व पोस्टसाठी लागू असलेला
शासकीय कॉम्प्युटर टायपिंग कोर्स
महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त : अधिकृत प्रशिक्षण केंद्र
* क्लासची वैशिष्ट्ये *
। महाराष्ट्र शासनाचे अधिकृत प्रमाणपत्र
। सुसज्ज कॉम्प्युटर लॅब
। गरजू विद्यार्थ्यांसाठी माफक फी
विघ्नहर कम्प्यूटर
अधिक माहितीसाठी संपर्क
धोंडे पाटील कॉम्प्लेक्स, गोकुळ कॉलनी, कॉलेज रोड, राहुरी
98 60 87 29 18 ☎ : 02426-295118

सायं. दैनिक
# सार्व मंथन
नवी दिशा, नवी आशा
मुख्य संपादक : अनिल कोळसे, मो. ९८२२५४४०७२
इंटरनेट आवृत्ती : गुगल वर पहा
www.sarvmanthan.in

श्रीयांश इंटरप्राईजेस
गिफ्ट गॅलरी, मोबाईल रिपेरिंग व ॲक्सेसरीज, ऑनलाईन सर्व्हिसेस
सर्व प्रकारचे इन्शुरन्स योग्य दरात करून मिळतील.
■ सीसी टी.व्ही. ■ इन्व्हर्टर बॅटरीची विक्री-दुरुस्ती व होम सर्व्हिस
■ सर्व प्रकारचे ऑनलाईन फॉर्म व शासकीय योजनेचे फॉर्म भरून मिळतील.
पत्ता : सुभक्ती कॉम्प्लेक्स, कुलकर्णी हॉस्पिटलच्या मागे, शुक्लेश्वर रोड, राहुरी, जि. अहिल्यानगर
संपर्क : ८७९३०९५०५०

। अहिल्यानगर । वर्ष ५ वे । अंक २५७ वा । शनिवार, ०९ मे २०२६ । पाने ४ । किंमत ३ रुपये । RNI No. MAH/MAR/2016/72596 । sarvmanthan16@gmail.com ।

**राहुरीत त्वरित विकणे आहे.**
राहुरी शहरातील मल्हारवाडी रोड भागीरथीबाई कॉलनी येथे पूर्व व पश्चिम दोन्ही बाजूने रस्ता असलेली १७५० स्के जागेत आर सी सी ३१०० स्के फुट बांधकाम तिन मजली बेल्डिंग त्वरित देणे आहे. पहिला मजला हॉल, किचन, दोन बेडरूम, संडास, बाथरूम, दुसऱ्या मजल्यावर सेम, तिसऱ्या मजल्यावर एक रूम संडास बाथरूम
संपर्क - ९८२२५४४०७२ / ९०२८००४०७२

**राहुरीत त्वरित वॉचमन पाहिजे.**
राहुरी शहरातील बाजार समिती समोरील त्रिमूर्ती कॉम्प्लेक्स, रकटे कॉम्प्लेक्स व उदावंत कॉम्प्लेक्स या ठिकाणी पूर्णवेळ (वॉचमन) पहारेकरी पाहिजे, योग्य तो पगार दिला जाईल.
संपर्क - ९८५०६५६१४८ / ९८२२३३७२०६

# पश्चिम बंगालमध्ये इतिहासाची पुनरावृत्ती

▶ अधिकारी यांनी घेतली मुख्यमंत्री पदाची शपथ
▶ सुवेंदू अधिकारी यांसह इतरांनीही घेतली शपथ

**कोलकाता**
सार्व मंथन । वृत्तसंस्था



सुवेंदू अधिकारी यांनी आज पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. ते पश्चिम बंगालमधील भाजपचे पहिले मुख्यमंत्री ठरले आहेत. भाजपच्या राजकीय आयुष्यातील आज ऐतिहासिक दिवस आहे. पश्चिम बंगालमध्ये पहिल्यांदा सत्तेवर आलेल्या भाजप सरकारचा आज शपथग्रहण सोहळा पार पडला आहे. कोलकाता ही पश्चिम बंगालची राजधानी आहे. तिथल्या ब्रिगेड परेड ग्राऊंडवर पहिल्यांदा शपथ ग्रहण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सुवेंदू अधिकारी यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. सुवेंदू अधिकारी यांचा शपथविधी म्हणजे एकप्रकारे पश्चिम बंगालमध्ये इतिहासाची पुनरावृत्ती आहे.

सुवेंदू यांचं मुख्यमंत्री बनणं हे बरच काही शिकवून जाणारं आहे.'हिरे की परख सिर्फ जोहरी को होती है', हे हिंदीत एक वाक्य आहे. सुवेंदू यांचा शपथविधीचं दृश्य पाहून त्याची आठवण होते. सुवेंदू यांच्या शपथविधी आधी इतिहासाची पानं चाळली तर याची सुरुवात काँग्रेसपासून होते. पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या मूळच्या काँग्रेसच्या. पण काँग्रेसमध्ये न्याय मिळत नसल्याने त्यांनी स्वत:चा पक्ष काढला. तृणमुल काँग्रेस. रस्त्यावरची लढाई, राजकीय संघर्ष करुन त्या पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री बनल्या.

आजचे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी हे ममता बॅनर्जी यांच्या राजकीय तालिमीत तयार झाले. ते आधी तृणमुल काँग्रेसमध्ये होते. ममता बॅनर्जी यांचा डावा हात मानले जायचे. त्यांनी तृणमुल काँग्रेसमधून मंत्रीपद भूषवलं. पुढे २०२० साली ममता बॅनर्जी यांच्यासोबत मतभेद झाल्याने ते भाजपात गेले. आता त्यांनी भाजपला सत्तेपर्यंत पोहोचवण्यात मोलाचं योगदान दिलं. पक्षाने त्याची परतफेड म्हणून त्यांना मुख्यमंत्री बनवलं.

'हिरे की परख सिर्फ जोहरी को होती है' या वाक्याची आठवण होण्यामागचं कारण हेच आहे.

**१५ वर्षांची सत्ता उलथवून मिळवलं यश**

सुवेंदू अधिकारी यांच्या आजच्या शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन उपस्थित आहेत. त्याशिवाय एनडीए शासित राज्यांचे मुख्यमंत्री सुद्धा आले आहेत. आज गुरुदेव रवींद्रनाथ टैगोर यांची जयंती आहे. हाच दिवस भाजपने शपथविधीसाठी निवडला आहे. २९४ सदस्यांच्या पश्चिम बंगालमध्ये भाजपने तब्बत २०७ जागांवर विजय मिळवला. म्हणजे भाजपकडे जवळपास दोन तृतीयांश जागा आहेत. ममता बॅनर्जी यांची १५ वर्षांची सत्ता उलथवून भाजपने हे यश मिळवलं आहे.

# शिर्डी संस्थान विद्यार्थींना शिक्षणासाठी मदत करणार

**शिर्डी**
सार्व मंथन । प्रतिनिधी



राज्यातील शेतकरी आत्महत्येमुळं उद्धस्त झालेल्या कुटुंबातील मुलांचे शिक्षण अर्धवट राहू नये यासाठी साईबाबा संस्थान पुढे सरसावले आहे. आत्महत्येमुळं उद्धस्त झालेल्या कुटुंबाती विद्यार्थ्यांना मोफत निवास आणि शिक्षणाची सुविधा दिली जाणार आहे. विशेष म्हणजे, १० वीमध्ये ८० टक्क्यांहून अधिक गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांना ११ वी आणि १२ वीचे संपूर्ण शिक्षण मोफत दिले जाणार असल्याची माहिती श्रीसाईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडिलकर यांनी दिली आहे.

आत्महत्येमुळं उद्धस्त झालेल्या कुटुंबातील विद्यार्थ्यांना मोफत निवास आणि शिक्षणाची सुविधा देण्याबरोबरच स्पर्धा परीक्षांसाठी महत्त्वाची असलेली उएढ ची फी देखील साईबाबा संस्थान भरणार आहे. भविष्यात छएएढ आणि गएए सारख्या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांसाठीही मोफत मार्गदर्शन आणि सुविधा सुरू करण्याची तयारी संस्थानने केली आहे.

आरोग्याच्या बाबातीत देखील साईबाबा पान २ वर

# चिंचोली शिवारात वाळू तस्करावर कारवाई

## डंपर, ट्रॅक्टर जप्त, चिंचोली शिवारातील काळे पॉईट जोरात?; गुन्हा दाखल

**राहुरी**
सार्व मंथन । विशेष प्रतिनिधी

अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रवरा नदीपात्रात वाळू चोरट्यांनी चांगलाच धुमाकूळ घातला असून याची खबर पोलीस पथकाला लागताच पोलिसांनी वाळूतस्काराच्या मुसक्या आवळल्या असून दोन वाळू तस्करांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून एका जणाला पोलिसांनी गजाआड केले आहे तर दुसरा फरार झाला असुन पोलीस पथकाने एक डंपर व एक ट्रॅक्टर जप्त केला आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की प्रवरा नदीपात्रातीलकाल संध्याकाळच्या दरम्यान चिंचोली गंगापूर रस्ता लगत असलेल्या नविन काळे पॉईट येथे वाळू वाहतुकीसाठी शेतात मुरुम टाकुन रस्ता तयार करण्यात आला होता. महसूल व पोलीस आशीर्वादाने तिनं ते चार



वाळु काढण्यासाठी यारया बोलले जात होते. पोलिसांनी या ठिकाणी छापा मारत डंपर व एक ट्रॅक्टर जप्त केला आहे यामध्ये दीपक गडाख व सुनील देवरे या दोघांना आरोपी करण्यात आले आहे तर सदरची फिर्याद पोलीस कर्मचारी देविदास कोकाटे यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिली आहे.

सदर वाळूही जेसीपी च्या साह्याने काढून डंपर व हायवा डरे शिर्डी कडे वाहतूक केली जात असल्याचे बोलले जात आहे. सुरू असलेल्या वाळू उपशाला नेमके कोणाचा आशीर्वाद महसूल की पोलीस हाही खरा प्रश्न ऐरणीवर आला आहे. रामपुर सोनगाव या ठिकाणी बंद केले तसे बंद करावे शेतकऱ्यावरही गुन्हे दाखल केले व वाळूत असताना वरही दंड केला.

पोलिसांनी सुनील बेंद्रे यास ताब्यात घेतले आहे तर दीपक गडाख हा खरार असल्याचे समजले आहे. सदर डंपर वर जगदंब प्रतिष्ठान असे लिहिलेले आहे हा पोलिसांनी जप्त केलेला डंपर शिर्डी भागातील असल्याचेही बोलले जात आहे.

# लग्नसमारंभात कट्टा लावून तरुणावर हल्ला

। ३ तोळ्याची सोन्याची चैन लांबविली

## जामीनावर एवढ्या लवकर कसा बाहेर आलास? तनपुरेला गडाखने लावला पिस्तुल

**राहुरी**
सार्व मंथन । प्रतिनिधी

राहुरी तालुक्यातील कन्हैय्या लॉन्स येथे सुरू असलेल्या हळदीच्या कार्यक्रमातच जुन्या वैमनस्याचा भडका उडाला असून, दोन जणांनी एका तरुणावर गावठी कट्टा लावून मारहाण करत त्याच्या गळ्यातील ३ तोळ्यांची सोन्याची चैन लुटल्याची धक्कादायक घटना ८ मे रोजी सायंकाळी घडली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत युवराज किरण तनपुरे (वय २१, रा. तनपुरे वाडी, राहुरी) यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तनपुरे हे आपल्या कुटुंबासह शेती व्यवसाय करून उदरनिर्वाह करतात. त्यांचे सागर ज्ञानदेव गडाख आणि रामेश्वर ऊर्फ दादासाहेब हंसराज गडाख (दोघेही रा. देवळाली प्रवरा, गडाख वस्ती, ता. राहुरी) यांच्याशी पूर्वीपासून वाद असल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

घटनेच्या दिवशी सायंकाळी साडेसातच्या सुमारास युवराज तनपुरे हे आपल्या मावसभाऊ सिद्धार्थ लांडे यांच्या हळदी समारंभासाठी कन्हैय्या लॉन्स येथे गेले होते. याचवेळी आरोपी सागर गडाख व रामेश्वर गडाख तेथे आले. रामेश्वर गडाख याने युवराज यांच्या गळ्यात हात टाकत त्यांना बाहेर नेले व तू एवढ्या लवकर जामीनावर कसा बाहेर आलास? पान २ वर

# ६ हजारासाठी तलाठी अँटीकरप्शनच्या जाळ्यात

**पुणे**
सार्व मंथन । वृत्तसेवा

वारस नोंद करण्यासाठी ६ हजारांची मागणी करुन ५५०० रुपये स्विकारताना लाचलूचपत विभागाकडून महिला तलाठी आणि कोतवाल यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. श्रीमती मनीषा साहेबराव माने (वय ४५, ग्राम महसूल अधिकारी तलाठी, निमगाव खंडोबा, ता. खेड राजगुरूनगर) आणि दत्तात्रय छबू चव्हाण (वय – ५८, पद कोतवाल, निमगाव खंडोबा, तालुका खेड राजगुरूनगर) अशी या दोन आरोपिंची नावे आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार तक्रारदार यांचे वडील व इतर नातेवाईक यांची नावे खरपडी बुद्रुक येथे शेतजमीन आहे. तक्रारदार यांच्या वडिलांचे २०२४ साली निधन झाल्यानंतर सदर जमिनीवर वारसनोंद घेण्याकरीता तक्रारदार हे यांन निमगाव खंडोबा ग्राम महसूल कार्यालय येथील अधिकारी मनीषा माने पाटील यांना अर्ज दिला होता. वारंवार चौकशी करून देखील तक्रारदार व त्यांचे भाऊ आणि बहिणीची जमिनीला वारसा नोंद केली जात नव्हती. त्यामुळे दिनांक ३० मार्च २०२६ रोजी तक्रारदार हे वारसा नोंदणी बाबत चौकशी करण्याकरिता निमगाव खंडोबा ग्राम महसूल कार्यालय येथे गेले असता श्रीमती माने यांनी चव्हाण यांना तक्रारदारकडून वारसा नोंद करण्यासाठी पैसे घेण्यास सांगितले.

त्यामुळेतक्रारदार पान २ वर

# विकास लवांडेंवर शाईफेक; ह.भ.प. भंडारेंसह साथीदारांकडून हल्ला

**पुणे**
सार्व मंथन । वृत्तसेवा

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रवक्ते विकास लवांडे यांच्यावर हल्ला झाला आहे. किर्तनकार संग्राम भंडारे यांच्यासह त्यांच्या साथीदारांनी लंवाडे यांना आळंदी परिसरात गाठलं. त्यांच्याशी असभ्य वर्तन करत अंगावर शाईच्या बाटल्या रिकाम्या केल्या.

यावेळी त्यांनी लंवाडे यांना धमकी देखील दिली आहे. शाईफेकीचा हा व्हिडीओ समोर आला असून सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

हा हल्ला झाल्यानंतर विकास लवांडे यांनी एक व्हिडीओ जारी करत घडलेला घटनाक्रम सांगितला आहे. त्यांनी व्हिडीओत म्हटलं की, ''आज सकाळी माझं आळंदी येथे दशक्रियेच्या कार्यक्रमानिमित्त प्रवचन होतं. ते प्रवचन संपल्यानंतर मी पुण्याच्या दिशेनं निघालो. वारकरी संप्रादयातील संग्राम भंडारे आणि १०–१५ गोरक्षक होते. त्यांच्या दोन तीन गाड्या होत्या. या सगळ्या गुंडांनी मला निर्जनस्थळी अडवलं. मला गाडीतून खाली उतरवून माझ्या अंगावर शाईच्या दोन–तीन बाटल्या ओतल्या, मला धक्काबुक्की केली. त्यातील दोघांकडे बंदूका होत्या. ते मला जीवे मारण्याची धमकी देत होते.

या हल्ल्यानंतर लोक जमत असताना हे सर्वजण तत्काळ पळून गेले. मी त्या सर्वांचा निषेध करतो. संग्राम भंडारे आणि त्यांच्यासोबत आलेले १०–१५ गुंड यांचा मी निषेध करतो. त्यांच्यावर पोलिसांनी तत्काळ कारवाई करावी. यासाठी मी लोणीकाळभोर पोलीस ठाण्यात मी आलो आहे. जोपर्यंत त्यांच्यावर कारवाई होत नाही.

**श शपथ**

मंत्रीमंडळ शपथविधी
न रहावा उपचारविधी
सिंहासनावर बसताना
संविधान जाणा आधी
लोकशाही नाळ जोडा
दारी आली सुवर्णसंधी
हक्काहून श्रेष्ठ कर्तव्य
नको नशिली सत्ताधुंदी
उपकार जनांचे स्मरावे
त्यांनी ही दिधली गादी
मालक न नौकर आहो
जनसेवक सार्थ उपाधी
ज्यांनी जितवले युध्द
स्मरणांत रहावी प्यादी
बोले तैसा चाले जाणा
कुणा ना लावावे नादी
महोत्सव हा करताना
नकोउन्माद हवी शुध्दी
सामावून घ्यावे विरोधी
विस्तारुन मनाची रुंदी
विधायक कार्या जुडावे
आता संपवा वादावादी
अभिनंदन खुल्यामनाने
कार्यक्षम राहो विरोधी
प्रलंबित कामाची यादी
अतिअपुरा पडे अवधि
शपथ पूर्व समजून घेई
अस्थायी असते रे गादी
- हेमंत मुसरीफ, पुणे
९७३०३०६९९६

# राहुरीच्या शिवाजी चौकात आगीचा कहर

# ‘न्यू नाकोडा स्वीट’ काही मिनिटांत राख!

## लाखोंचे नुकसान; व्यापाऱ्यावर आर्थिक संकट; नुकसान भरपाईची मागणी


**राहुरी**
सार्व मंथन । विशेष प्रतिनिधी

राहुरी शहरातील गजबजलेल्या शिवाजी चौकात असलेल्या ‘न्यू नाकोडा स्वीट’ या प्रसिद्ध मिठाई दुकानाला पहाटेच्या सुमारास अचानक भीषण आग लागून संपूर्ण दुकान जळून खाक झाल्याची धक्कादायक घटना घडली. या आगीत दुकानातील फर्निचर, डी–फ्रीज, दूध व विविध खाद्यपदार्थांसह सुमारे पाच ते सहा लाखांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत असून व्यापारी दिनेशसिंग राजपुरोहित व गोपालसिंग राजपुरोहित यांच्यावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे.

पहाटेच्या शांततेत अचानक उठलेल्या धुराच्या लोटांनी परिसरात एकच खळबळ उडाली. ही घटना सर्वप्रथम मिठाई दुकानासमोर राहणारे सर्वेश जोशी यांच्या निदर्शनास आली. त्यांनी तातडीने उपनगराध्यक्ष गजानन सातभाई यांच्याशी संपर्क साधला. सातभाई यांनी तत्काळ राहुरी नगर परिषदेच्या अग्निशमन दलाला पाचारण केले.

घटनास्थळी अग्निशमन दलाचे प्रमुख राजेंद्र पवार व अग्निशमन चालक गडाख यांनी धाव घेत आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र, तोपर्यंत आगीने रौद्ररूप धारण केले होते. काही क्षणांतच संपूर्ण दुकान ज्वाळांच्या विळख्यात सापडले आणि सर्व साहित्य राख झाले.

वेळीच अत्याधुनिक सुविधा आणि तत्पर यंत्रणा उपलब्ध असती तर लाखोंचे नुकसान टळले असते, अशी संतप्त प्रतिक्रिया व्यापारी व नागरिकांमधून उमटत आहे.






दरम्यान, नगरसेवक अमोल काशीद यांनीही घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले. तसेच पंचनामा करण्यासाठी महसूल प्रशासनाची काशीद यांनी संपर्क करत मदत करण्याची सुचना केली.

आग विझविणे, साहित्य बाहेर काढणे व परिसर सुरक्षित करण्यासाठी कुशल बाफणा, हर्षवर्धन मेहेत्रे, ऋषिकेश जोशी, हर्षल बाफना, ताहीर शेख, प्रमोद मेहत्रे, अविनाश मेहत्रे, निलेश पांडे, मनोज अंबिलवादे, आशिष बाफना आदींनी मोठी मदत केली.

या भीषण घटनेमुळे व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, नुकसानग्रस्त व्यावसायिकाला तातडीने आर्थिक मदत व शासनाकडून नुकसानभरपाई द्यावी, अशी जोरदार मागणी शहरातील व्यापारी वर्गातुन होत आहे.



## संपादकीय...

मो. ९८२२५४४०७२

# उष्माघाताचे संकट!

यंदाचा उन्हाळा केवळ घामाच्या धारा काढणारा नसून अंगाची लाहीलाही करणारा आणि जीवघेणा ठरू लागला आहे. महाराष्ट्रासह संपूर्ण देश सध्या एका भीषण नैसर्गिक संकटाचा सामना करत असून, तापमानाने चाळिशी केव्हाच ओलांडून आता ४७ अंशांच्या दिशेने कूच केली आहे. महाराष्ट्रातच नव्हे तर देशातील काही भागांतील नागरिकांना एका भीषण नैसर्गिक संकटाचा सामना करावा लागत आहे. अनेक राज्यांमध्ये तापमानाचा उच्चांक पाहायला मिळत असून, नागरिक निसर्गाच्या अत्यंत दाहक आणि भीषण संकटाशी सामना करत आहेत. वैशाख वणव्याची दाहकता एप्रिलमध्येच जाणवू लागली असून, ४५ अंशांच्या पार गेलेल्या तापमानामुळे आभाळातून पावसाऐवजी आगीच्या ज्वाळाच खाली येत आहेत की काय, अशी भीषण स्थिती निर्माण झाली आहे. उत्तर प्रदेशातील बांदा येथे देशातील सर्वाधिक ४७.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असून, उन्हाच्या तडाख्याने सीमा ओलांडली आहे. राजस्थान, पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि मध्य प्रदेशासह पूर्व भारतातील पश्चिम बंगाल, बिहार आणि झारखंडमध्येही सूर्याचा प्रकोप जाणवत आहे. दक्षिण भारतात तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशात उष्णतेच्या लाटेने धोक्याची पातळी ओलांडली. ओडिशामध्येही उष्णतेने उच्चांक गाठला आहे. दुसऱ्या बाजूला जम्मू-काश्मीरसारख्या थंड प्रदेशातही तापमानाचा पारा चढलेला दिसत असून, ही स्थिती काळजाचा ठोका चुकवणारी आहे. राज्यात नेहमीप्रमाणे विदर्भातील अकोला, चंद्रपूर आणि नागपूर या जिल्ह्यांत उष्णतेने कहर आहे. विशेषतः अकोल्याचा पारा ४६.९ अंशांवर पोहोचल्याने हे शहर उष्ण शहरांच्या यादीत स्थान वरच्या स्थानी आहे. केवळ विदर्भच नव्हे, तर मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातही उष्णतेच्या लाटेने नागरिकांची लाहीलाही होत आहे. उष्णतेच्या लाटांचा भूगोल आता वेगाने बदलत असून, उत्तर भारताकडून ही आग मध्य आणि दक्षिण भारताकडे सरकली आहे. अगदी हिमालयाच्या कुशीतील जम्मू-काश्मीरही या आगीतून सुटलेले नाही. ही उष्णता आता केवळ घामाच्या धारा काढणारी उरली नसून ती थेट जीव घेण्यावर टपली आहे. परभणीपासून हिंगोलीपर्यंत आणि नगरपासून नागपूरपर्यंत सात-आठ जणांचा उष्माघातामुळे मृत्यू झाला आहे. शेतात राबणारा शेतकरी आणि कामासाठी पायपीट करणारा कष्टकरी आज या निसर्गनिर्मित संकटाचा बळी पडत आहे, हे विदारक सत्य आहे. पर्यावरण शास्त्रज्ञांच्या मते, ही दाहकता केवळ ऋतुचक्राचा भाग नसून 'हवामान बदलाचा' एक धोक्याचा इशारा आहे. वाढते सिमेंटचे जंगल आणि बेसुमार वृक्षतोडीमुळे निसर्गाचा समतोल ढासळला असून, जागतिक तापमान वाढीमुळे उष्णतेच्या लाटांची वारंवारता आणि तीव्रता दोन्ही आता नियंत्रणाबाहेर गेल्या आहेत. पूर्वी मे महिन्यात जाणवणारे उन्हाचे चटके आता मार्च-एप्रिलमध्येच अंगाची लाहीलाही करत आहेत. मार्च महिन्यातच तापमानाचा पारा ४० अंशांच्या पार जाणे, ही धोक्याची घंटा मानली जात होती. दिल्ली, उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये तर अनेक ठिकाणी तापमान ४७ – ४८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. ज्यामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. वाढत्या धोक्यामुळे सरकारकडून अनेक जिल्ह्यांत 'येलो अलर्ट' जारी केला आहे. उष्माघात हा या हवामान बदलाचा सर्वात घातक परिणाम आहे. वाढत्या उष्णतेमुळे शरीराची तापमान नियंत्रण प्रणाली कोलमडते, ज्यामुळे गंभीर आजार किंवा मृत्यू ओढवू शकतो. सरकारी आकडेवारीनुसार, गेल्या दशकात देशात उष्णतेमुळे हजारो नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे. शेतमजूर, बांधकाम कामगार आणि रस्त्यावरील विक्रेते यांसारख्या उघड्यावर काम करणाऱ्या वर्गाला याचा सर्वाधिक फटका बसत आहे. उष्णतेचे हे संकट केवळ आरोग्यापुरते मर्यादित नाही. कडक उन्हामुळे शेतीतील पिकांचे नुकसान होत आहे, ज्यामुळे अन्नसुरक्षेचा प्रश्न निर्माण होतोय. तसेच, वाढत्या वीज वापरामुळे ऊर्जेची टंचाई निर्माण होऊन वीज कपात करावी लागत आहे. 'श्रम उत्पादकता' कमी झाल्यामुळे देशाच्या जीडीपीवरही याचा नकारात्मक परिणाम होत असल्याचे जागतिक अहवाल सांगतात. उष्णतेमुळे पिकांवर ताण येतो आणि पाण्याची मागणी वाढते. हिमालयातील बर्फ वितळण्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे नद्यांच्या पाणीपुरवठ्यावरही परिणाम होत आहे. राज्यातील विदर्भात, विशेषतः अकोला येथे तापमान ४६.९ओ सेल्शिअसवर गेल्याने सध्या विदर्भ हा उष्माघाताचा 'हॉटस्पॉट' ठरला आहे. महाराष्ट्रात २०२६ च्या उन्हाळ्यात आतापर्यंत उष्माघातामुळे ७ ते ८ जणांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. पॅसिफिक महासागरातील पाण्याच्या तापमानातील बदलांमुळे मान्सूनवर परिणाम होऊन उष्णतेची तीव्रता वाढली आहे. उष्माघाताचे संकट हे निसर्गाचे एक प्रकारची प्रतिक्रिया आहे. आपण निसर्गाचा जो समतोल बिघडवला आहे, त्याचे परिणाम आता आपण भोगत आहोत. जर आपण आताच कार्बन उत्सर्जन कमी करणे आणि निसर्ग संवर्धनाकडे लक्ष दिले नाही, तर भविष्यातील पिढ्यांसाठी हा उन्हाळा अधिक असह्य आणि प्राणघातक ठरेल.

## नैसर्गिक शेतीतील निविष्ठांसाठी एकात्मिक
# शेती पद्धतीचे मॉडेल फलदायी ठरेल : कुलगुरु खर्चे

**राहुरी विद्यापीठ**
सार्व मंथन । प्रतिनिधी

रासायनिक खतांच्या अमर्याद वापरामुळे बिघडलेले जमिनीचे आरोग्य, हवामानातील बदल, पाण्याची प्रत याचा परिणाम पिकांच्या उत्पादकतेवर होत आहे. जमिनीचे आरोग्य सुधारण्यासाठी तसेच शेती शाश्वत करण्यासाठी पुणे येथे मा. राज्यपालांच्या पुढाकारातून महाराष्ट्रात प्रथमच नैसर्गिक शेतीवर भव्य कार्यशाळा आयोजित करण्यात आली. नैसर्गिक शेतीसाठी निविष्ठांच्या निर्मितीचा अडसर येऊ नये म्हणून शेतावरच निविष्ठा तयार करावयाच्या आहेत. यासाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठाने तयार केलेले एकात्मिक शेती पद्धतीचे मॉडेल फलदायी ठरेल असे प्रतिपादन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी केले.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, कृषी विभाग, महाराष्ट्र शासन व आत्मा यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे विभागीय नैसर्गिक शेती कार्यशाळेचे आयोजन महात्मा फुले कृषी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय सभागृहात करण्यात आले. या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी झालेल्या कार्यक्रमात अध्यक्ष स्थानावरून कुलगुरू डॉ. विलास खर्चे बोलत होते. याप्रसंगी आत्माचे संचालक सुनील बोरकर, कृषी संचालक विनयकुमार आवटे, पुणे विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक दत्तात्रय गवसाने, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, अधिष्ठाता




(कृषी) डॉ. साताप्पा खरबडे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, प्रकल्प संचालक, आत्मा, अहिल्यानगर प्रदीप लाटे, प्रकल्प संचालक, आत्मा, पुणे सुरज मडके, प्रकल्प संचालक, आत्मा, सोलापूर डॉ. कांताप्पा खोत, कृषीविद्या विभागाचे प्राध्यापक व सेंद्रिय शेती प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. उल्हास सुर्वे, रोमिफ इंडियाचे संस्थापक डॉ. प्रशांत नाईकवाडी, कृषि विज्ञान केंद्र, दहिगावणेचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. शामसुंदर कौशिक, सागर गायकवाड, राजाराम गायकवाड व श्रीरामपूरचे उपविभागीय कृषी अधिकारी प्रवीण गोसावी उपस्थित होते.

यावेळी कुलगुरू डॉ. विलास खर्चे आपल्या मार्गदर्शनामध्ये पुढे म्हणाले की शेण, गोमूत्र, पिकांचे अवशेष हे सर्व शाश्वत शेतीसाठी महत्त्वाचे असून त्यासाठी नैसर्गिक शेतीला समजून घेतले पाहिजे. या कार्यशाळेमध्ये सहभागी झालेल्या शेतकर्यांनी नैसर्गिक शेतीचे तंत्रज्ञान या कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करणार्या तज्ञांकडून प्रथम समजून घ्या, आपल्या मनामध्ये कोणताही संभ्रम ठेवू नका. सुनील बोरकर नैसर्गिक शेती बहुआयामी दृष्टिकोन या विषयावर बोलताना म्हणाले की या कार्यशाळेत सहभागी झालेल्या शेतकर्यांवर एक विशेष जबाबदारी आहे, ती म्हणजे या कार्यशाळेतून त्यांनी प्रेरणा घेऊन आपल्या भागात नैसर्गिक क्रांती घडवायची आहे. तुम्ही तुमच्या शेतीमध्ये केलेला प्रयोग इतर लोकांना सांगायचा आहे. मला जे मिळाले आहे ते मी इतरांना देईल या विचाराने प्रेरित होऊन येथून जायचे आहे. प्रत्येकाने ३० ते ४० शेतकर्यांना नैसर्गिक शेती संबंधित ज्ञान द्यायचे आहे. तांत्रिक सत्रामध्ये अहमदाबाद येथील गीर गो शाळेचे संस्थापक गोपाळभाई सुतारीया, डॉ. प्रशांत नाईकवाडी, डॉ. उल्हास सुर्वे व दत्तात्रय शेरकर यांनी नैसर्गिक शेतीशी संबंधीत विविध विषयांवर उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी नैसर्गिक शेतीमध्ये वापरण्यात येणार्या विविध निविष्ठांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दत्तात्रय गवसाने यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उल्हास राक्षे यांनी तर आभार प्रदीप लाटे यांनी मानले.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**घोडेगाव**
सार्व मंथन । प्रतिनिधी

नेवासा तालुक्यातील घोडेगाव परिसरात शुक्रवारी (दि. ८ मे) सकाळी अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या अपघातात जितेश जानू चव्हाण (वय ३७, रा. मलकापूर, ता. पातूर, जि. अकोला) यांचा जागीच मृत्यू झाला.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, जितेश चव्हाण हे आपल्या दुचाकीवरून छत्रपती संभाजीनगर येथून पुण्याकडे जात होते. सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास घोडेगाव (ता. नेवासा) परिसरात आले असता त्यांच्या दुचाकीला पाठीमागून भरधाव अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत ते खाली कोसळले व त्यांच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच सोनई पोलीस स्टेशनचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जखमी अवस्थेत त्यांना उपचारासाठी नेवासा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी उपचारापुर्वी मृत घोषित केले.

या घटनेची खबर मृताचे नातेवाईक चरण जानू चव्हाण (वय ३४) यांनी दिली असून, अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पंचायत राज अभियान समितीची भेट

**श्रीरामपूर**
सार्व मंथन । प्रतिनिधी

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत गावची पाहणी करिता राज्य सरकारने नियुक्त केलेल्या समितीने उंदीरगाव येथे भेट देऊन विकास कामाची पाहणी केली.

अशोक कारखान्याचे संचालक वीरेश गलांडे पाटील, सुरेश पाटील गलांडे,ग्रामसेवक आसने, सरपंच गोलवड यांनी समितीच्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले. समितीने संत तेरेसा चर्च, मुलांचे व मुलींचे विद्यालय येथे भेट देऊन पाहणी करून माहिती घेतली. या वेळी त्यांचे स्वागत प्रमुख धर्मगुरू फा. डॉमिनिक रोजारिओ व फा. फ्रान्सिस ओहोळ यांनी स्वागत केले.श्री फिलिप पंडित यांनी परिसराची माहिती दिली. त्यानंतर समितीने प्राथमिक आरोग्य केंद्र,जिल्हा परिषद शाळा,अंगणवाडी ची पाहणी केली.गावातील विविध योजनाची माहिती घेऊन समाधान व्यक्त केले.

गट विकास अधिकारी उद्धव सानप, विस्तार अधिकारी पंचायत समिती बापुराव राख, उद्धव नेटके विस्तार अधिकारी कृषी, संतोष खटाने उप अभियंता, अर्शद शेख सहायक अभियंता यांच्यासह श्रीरामपूर पंचायत समितीचे अशोक खेडेकर, दीपक मेहरे यांचा समावेश होता.

# अहिल्यानगरला अग्रगण्य शहर बनविणार : पालकमंत्री विखे

## चितळे रोड येथे नेहरू मार्केट भूमिपूजन समारंभ उत्साहात संपन्न

**अहिल्यानगर**
सार्व मंथन । प्रतिनिधी

बदलत्या काळानुसार शहरांची रचना आणि सुविधा विकसित करणे ही काळाची गरज असून नावीन्यपूर्ण विकासकामांच्या माध्यमातून अहिल्यानगरला राज्यातील अग्रगण्य शहराची ओळख मिळवून द्यावी. सामान्य नागरिकांना अधिकाधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देत सार्वजनिक सुविधा, आधुनिक बाजारपेठा आणि सार्वजनिक उद्यानांसारख्या प्रकल्पांना प्राधान्य देण्यात येणार असल्याचे प्रतिपादन जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

शहरातील चितळे रोड येथे नेहरू मार्केटचे भूमिपूजन पालकमंत्री विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमास आमदार संग्राम



जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री विखे पाटील म्हणाले, नेहरू मार्केटची स्थापना १९६७ साली झाली असून या बाजारपेठेने शहराच्या व्यापारी विकासात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आज या मार्केटला नव्या स्वरूपात ऊर्जितावस्था प्राप्त होत आहे. शहर झपाट्याने बदलत असताना जुन्या शहराच्या पाऊलखुणा जपणेही तितकेच महत्त्वाचे आहे. विकास करताना शहराचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा विसरून चालणार नाही, असेही ते म्हणाले.

नावीन्यपूर्ण प्रयोग आणि नियोजनबद्ध विकासातून शहराचे स्वरूप बदलता येणार असून अहिल्यानगरला राज्यातील आदर्श आणि अग्रगण्य शहर म्हणून विकसित करण्यासाठी विकासकामांना गती देण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

सुमारे ९ कोटी ३४ लक्ष रुपयांच्या निधीतून तळमजल्यासह तीन मजली मार्केटची उभारणी करण्यात येणार आहे. यामध्ये ५७ गाळे व ५३ ओटे बांधण्यात येणार आहेत. व्यापाऱ्यांना या ठिकाणी आवश्यक त्या सर्व सुविधाही देण्यात येणार आहेत.

कार्यक्रमास पदाधिकारी, व्यापारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## राहुरीत जागा भाडोत्री देणे आहे

नगर मनमाड रोड हॉटेल आकाश शेजारी जोगेश्वरी आखाडा जवळ पाच गुंठे चे शेड व पडवी व मोकळी जागा भाडोत्री देणे आहे.
संपर्क :- मोबाईल नंबर ९४२२०२१०२६ (११ मार्च)

## मुळव्याध, मुतखडा व भगंदर त्वचारोग आयुर्वेदिक औषधाने बरा

मुळव्याध रक्त पडणे, कोंब, आग होणे, भगंदर, शौचास त्रास तसेच मुतखडाचे सर्व आजारावर-आयुर्वेदिक औषध मुतखडा (किडनी स्टोन) १ एमएम ते ४० एमएमचे-खडे औषधाने विरघळतात. पोट, कंबर, गुडघे दुखणे यावर आयुर्वेदिक रामबाण
औषध ऑपरेशनची गरज नाही, त्वचा रोग संबंधी सर्व औषध उपलब्ध आयुर्वेदिक बरे झालेले पेशंटचे व्हिडिओ पहायला मिळेल.
संपर्क-अशोकराव पालवे वांजुळपोई, ता. राहुरी मो. नं. ९३७०५०४७७६ (०३ डिसेंबर)

## राहुरीत गाळे भाडोत्री देणे आहे

राहुरी मार्केट यार्ड मधील शेतकरी भवन मागे एक हॉल ४९ बाय ३४ व ११ बाय ३४ चे गाळे भाडोत्री देणे आहे. तरी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
संपर्क-९४०४५३९७०७, ९८८१७६०३२४ (०६ डिसेंबर)

फिक्स चान्स के लिए संपर्क करे
100% कोहिनुर Rs. 100/-
कल्याण राजधानी नाईट साप्ताहिक
साप्ताहिक Date : 4.5.26
कल्याण - राजधानी (डे/ना) मेन बाजार (ओपन) या (क्लोज) मेन बाजार
Date : 4.5.26

| | | | |
|---|---|---|---|
| 2 237 390 679 | 7 269 368 467 | 4 149 158 590 | 9 180 478 568 |
| 3 580 670 689 | 8 170 378 567 | 5 230 258 780 | 0 235 370 578 |
| 4 149 158 167 | 9 180 289 478 | 6 150 259 358 | 1 100 380 560 |
| 5 168 690 780 | 0 190 389 569 | 7 278 250 890 | 2 237 345 570 |
| 6 367 349 790 | 1 128 245 489 | 8 125 189 459 | 3 346 490 670 |
| 7 278 250 890 | 2 129 138 147 | 9 360 450 469 | 4 149 167 789 |

कायमचा मेंबरसाठी संपर्क साधा (अंकशास्त्रावर आधारित दुर उपयोग करु नये)

फिक्स चान्स के लिए संपर्क करे
100% कोहिनुर Rs. 100/-
कल्याण राजधानी नाईट साप्ताहिक
साप्ताहिक Date : 4.5.26
कल्याण राजधानी (डे/ना) मेन बाजार (ओपन) या (क्लोज) मेन मुंबई
100% Date Fix FREE GAME Open to Clos

| सोमवार ते मंगळवार | बुधवार ते गुरुवार |
|---|---|
| 4 338 699 9 388 144 — 40 - 45 x 90 - 95 | 5 366 447 0 118 299 — 51- 56 X 01- 06 |

| शुक्रवार ते शनिवार | साप्ताहिक |
|---|---|
| 1 227 588 6 277 330 — 12 - 17 x 62 - 67 | 2 336 499 7 188 449 — 23 - 28 X 73 - 78 |

साप्ताहिक CP 56 X 45 67 X 34 12 X 23
विचार बदला नशीब बदलेल
संपर्क : 9970640587


# मालट्रकच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**श्रीरामपूर**
सार्व मंथन । प्रतिनिधी

शहरात श्रीरामपूर संगमनेर रस्त्यावर नार्दन बँच कॅनाल वरील पुलाजवळ एका मालट्रकच्या धक्याने गंभीर जखमी होऊन महिला गीता जयराम उपाध्ये (वय ५३) यांचा जागीच मृत्यू झाला आहे.

मयत गीता उपाध्ये या सायंकाळी आपल्या घराकडे जात असतांना मालट्रक नंबर एम. एच. १६, ए. ई. ४५११ ने रस्त्याने भरधाव वेगाने जात असतांना रस्त्याने जाणार्या महिलेस जोराने धडक दिली. अपघातात त्या गंभीर जखमी होऊन जागीच मृत पावल्याची घटना गुरूवार, दि. ८ मे रोजी सायंकाळी घडली. अपघातानंतर शहर पोलिसांनी गीताच्या मृत्यूप्रकरणी अकस्मात मृत्युची नोंद केली असून अपघातानंतर रस्त्यावर झालेली वाहनांची गर्दीची कोंडी पोलिसांनी दूर करून वाहतूक सुरळीत केली. अपघातानंतर पोलिसांनी मालट्रक ताब्यात घेवून पोलिस ठाण्यासमोर आणून उभा केला आहे. मालट्रकवर भाग्यलक्ष्मी असे लिहिलले आहे.


पान १ वरून पान १ वरून


## शिर्डी संस्थान विद्यार्थींना शिक्षणासाठी मदत करणार

संस्थानच्या माध्यमातून रुग्णांना मोठ्या प्रमाणात मदत तसेच उपचार केले जातात. शिक्षणासाठी देखील गरजू विद्यार्थ्यांना साईबाबा संस्थानच्या माध्यमातून मदत केली जाते. श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी हे भारतातील एक प्रमुख आणि श्रीमंत देवस्थान आहे. जे साईबाबांच्या समाधी मंदिराचे व्यवस्थापन करते. 'सबका मालिक एक' ही शिकवण देणाऱ्या साईबाबांच्या दर्शनासाठी जगभरातून लाखो भाविक येथे येतात.

## लग्नसमारंभात कट्टा लावून तरुणावर हल्ला

असे म्हणत शिवीगाळ सुरू केली. युवराज यांनी हा लग्नाचा कार्यक्रम असल्याने वाद टाळण्याचा प्रयत्न केला. मात्र, दोन्ही आरोपींनी त्यांना हाताने मारहाण केली. यानंतर रामेश्वर गडाख याने थेट युवराज यांच्या पोटाला गावठी कट्टा लावून धमकावले, तर सागर गडाख याने त्यांच्या गळ्यातील अंदाजे ३ तोळ्यांची सोन्याची चैन जबरदस्तीने ओढून घेतल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या झटापटीतून कसाबसा सुटून युवराज तनपुरे यांनी किरण उत्तम पठारे यांना फोन करून घडलेला प्रकार सांगितला. त्यानंतर दोघेही राहुरी फॅक्टरी येथे भेटून थेट राहुरी पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. या घटनेमुळे लग्नासारख्या आनंदाच्या प्रसंगीही गुन्हेगारीचे सावट वाढत असल्याची चर्चा परिसरात रंगली आहे. जुन्या वादातून उफाळलेली ही घटना पोलिसांसमोर मोठे आव्हान ठरत असून, संबंधित आरोपींवर कडक कारवाईची मागणी होत आहे. पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहेत.

## ६ हजारासाठी तलाठी अँटीकरप्शनच्या जाळ्यात

दिनांक ०७ मे.२०२६ रोजी चव्हाण यांना भेटले असता त्यांनी तक्रारदार यांच्याकडे श्रीमती माने व स्वत:साठी ६ हजार रुपयांची लाच मागणी केली. याबाबत तक्रारदार यांनी लाचलूचपत विभागाकडे तक्रार केल्यानंतर वर नमुद आरोपी लोकसेवक यांना लाचेची रक्कम स्विकारताना लाचलुचपत विभागच्या पोलिस निरीक्षक श्रीमती शैलजा शिंदे यांच्या टीमने या आरोपिंना रंगेहात पकडले. त्यांच्याविरुद्ध खेड – राजग्रुनगर पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ कलम प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## थोडक्यात

### शिवचिदंबर माध्यमिक विद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

सार्व मंथन घोडेगाव। नेवासा तालुक्यातील गणेशवाडी येथील शिवचिदंबर माध्यमिक विद्यालयाची निकालाची परंपरा या ही वर्षी कायम. एस.एस सी मार्च २०२६चा निकाल९५.५५% परीक्षेत प्रविष्ट ४५,परीक्षेत हजर ४५,उत्तीर्ण ४३,अनुतीर्ण २, श्रुती विठ्ठल दरंदले .९२%,अंकिता अण्णासाहेब बेल्हेकर ९१%, अनुष्का पांडुरंग मडके ८७.४०%, आरती रामेश्वर तांदळे ८४%, भक्ती दिगंबर लोहकरे ८३.६०%, या प्रमाणे मुलींनी बाजी मारली. विशेष प्राविण्य १६,प्रथम श्रेणी २३,द्वितीय श्रेणी ५,सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणारे सर्व शिक्षक बंधू भगिनीचे संस्थेचे सचिव दत्तात्रय लोहकरे पाटील मुख्याध्यापक राजेंद्र लोहकरे यांनी हार्दिक अभिनंदनकेले आहे.

### उंबरे शाळेचा निकाल शंभर टक्के

सार्व मंथन उंबरे। राहुरी तालुक्यातील पूर्व भागात असलेल्या आदर्श विद्यालय ब्राह्मणी भाग शाळा उंबरे या शाळेचा इयत्ता दहावीचा निकाल शंभर टक्के लागला आहे , चि. यामध्ये आदित्य नानासाहेब बारवेकर ९४/६० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला , कु. प्रत्यूषा अरुण काळे हिने ९१/८० द्वितीय क्रमांक तर कु . मेघा नामदेव शिरसागर येणे ९१/६० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला आहे. यांच्या या यशामध्ये शाळेचे मुख्याध्यापक मच्छिंद बोंबले, पर्यवेक्षक एस एस जाधव, पि के पवार, जे एन दुशिंग, एस ए गुंजाळ, एस जी जाधव, आर ए कदम, एस के कदम, सी एस मरभळ, एस एस बेल्हेकर, एस एस तांबे,, सय्यद, घुले, घोडके मॅडम, बी बी गाडे आदींचे बहुमोल मार्गदर्शन लाभले असून, सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे डॉक्टर तनपुरे कारखान्याचे माजी चेअरमन नामदेवराव ढोकणे, विद्यमान संचालक भास्कर ढोकणे,माजी संचालक सुनील आडसुरे , साहेबराव दुशिंग, स्कूल कमिटी चे अध्यक्ष भाऊराव ढोकणे , शरद वसंत ढोकणे यांच्यासह समस्त ग्रामस्थ उंबरे यांनी अभिनंदन केले आहे.

### अमृतवाहिनीत गुणवंत विद्यार्थी : मुखर्जी

सार्व मंथन संगमनेर। अमृतवाहिनी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, संगमनेर येथे आयोजित उड्डाण २०२६ वार्षिक स्नेहसंमेलन व निरोप समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. महाराष्ट्रात शैक्षणिक क्षेत्रात नेहमीच अग्रेसर असलेल्या अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या अमृतवाहिनी एमबीए महाविद्यालयात चालू शैक्षणिक वर्षात उडान २०२६ वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम ३० एप्रिल रोजी उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाची सुरवात दीप प्रज्वलन व स्वर्गीय भाऊसाहेब थोरात यांच्या प्रतिमेस पुष्पगुच्छ अर्पण करून झाली. या कार्यक्रमासाठी आलेल्या प्रमुख अतिथी यांचा सत्कार महाविद्यालयाचे संचालक डॉ.बी एम लोंढे यांच्या हस्ते करण्यात आला.

### सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्ग भूसंपादन प्रक्रियेत

# पारदर्शकता राखून मोबदला वितरण तातडीने करा

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील; जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक

**अहिल्यानगर**
सार्व मंथन । प्रतिनिधी



सुरत–चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्ग प्रकल्पासाठी सुरू असलेल्या भूसंपादन प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता राखून काम काज करण्यात यावे. जमीन संपादन करताना संबंधित जमिनीबरोबरच त्या ठिकाणी असलेली झाडे, विहिरी, पाईपलाईन तसेच इतर मालमत्तांचे मूल्यांकन अचूक व निश्चित कार्यपद्धतीनुसार करण्यात यावे. मूल्यांकन प्रक्रियेत कोणतीही तफावत राहणार नाही व शासनाच्या निश्चित कार्यपद्धतीत कोणताही बदल होणार नाही याची संबंधित अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी, असे निर्देश जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात सुरत–चेन्नई ग्रीनफिल्ड महामार्ग निवाड्यांसंदर्भात आयोजित आढावा बैठकीत पालकमंत्री डॉ. विखे पाटील बोलत होते.

बैठकीस जिल्हाधिकारी पंकज आशिया, उपविभागीय अधिकारी नितीन पाटील, माणिक आहेर, अरुण उंडे, किरण सावंत–पाटील, विशेष भूसंपादन अधिकारी अतुल चोरमारे, सायली सोळंके, राष्ट्रीय महामार्गाचे प्रकल्प संचालक मिलिंदकुमार वाबळे, व्यवस्थापक सत्यम राय, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांच्यासह संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, महामार्गासाठी आवश्यक असलेल्या उर्वरित जमिनीचे भूसंपादन तातडीने पूर्ण करण्यात यावे. संबंधित विभागांनी परस्पर समन्वय ठेवून प्रलंबित प्रकरणे जलदगतीने निकाली काढावीत. जमीन संपादित केलेल्या शेतकऱ्यांना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून प्राप्त झालेला मोबदल्याचा निधी कोणताही विलंब न लावता त्वरित वितरित करण्यात यावा. मोबदला वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राखून पात्र लाभार्थ्यांना वेळेत रक्कम मिळेल याची दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

यावेळी पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी पाचही तालुक्यातील उपविभागीय अधिकाऱ्यांकडून तालुकानिहाय माहिती घेत प्रलंबित विषय तातडीने निकाली काढण्याचे निर्देश दिले.

जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी प्रकल्पाच्या सद्यस्थितीची माहिती देताना सांगितले की, अहिल्यानगर जिल्ह्याच्या अहिल्यानगर, संगमनेर, राहुरी, राहाता व जामखेड या ५ तालुक्यातील ६५ गावांमधून हा महामार्ग जात असून जिल्ह्यातील याची लांबी १३९.५१ किलोमीटर एवढी आहे. या महामार्गासाठी १०४४ हेक्टर आर क्षेत्रापैकी ४११.९०८ हेक्टर आर क्षेत्राचे भूसंपादन पूर्ण झाले असून उर्वरित प्रक्रियेबाबत प्रशासनामार्फत सुरू असलेल्या कार्यवाहीची माहिती दिली. प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत व समन्वय करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

# मुळा व्हॅली स्कूलचा शंभर टक्के निकाल: तनुष्का काळनर प्रथम

**राहुरी**
सार्व मंथन । शहर प्रतिनिधी



प्रबोधन एज्युकेशन अँण्ड रिसर्च फौंडेशन संचलित मुळा व्हॅली पब्लिक स्कूल, आग्रेवाडी या विद्यालयाने इयत्ता दहावीच्या परीक्षेत यंदाही दैदिप्यमान यश संपादन करत सलग आठव्या वर्षी १०० टक्के निकालाची उज्वल परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाच्या या नेत्रदीपक यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विद्यार्थ्यांवर, शिक्षकांवर आणि पालकांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

विद्यालयातील विद्यार्थ्यांनी गुणवत्तेची परंपरा कायम राखत यंदाच्या परीक्षेतही घवघवीत यश मिळविले. निकालामध्ये १४ विद्यार्थ्यांनी ७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त केले, तर १८ विद्यार्थ्यांनी ६० ते ७५ टक्के गुण मिळवत उत्कृष्ट कामगिरी बजावली. तसेच दोन विद्यार्थ्यांनी ५५ ते ६० टक्क्यांदरम्यान गुण मिळवत विद्यालयाच्या यशात मोलाची भर घातली.

या परीक्षेत तनुष्का भास्कर काळनर हिने ९१.२० टक्के गुण मिळवत विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. अनुष्का सचिन काकडे हिने ८८.८० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर अनुज संभाजी माने याने ८८.४० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. अक्षदा साहेबराव डुकरे हिने ८७.४० टक्के गुण मिळवत चौथा क्रमांक मिळविला, तर स्नेहल सोपान जाधव हिने ८५ टक्के गुणांसह पाचवा क्रमांक संपादन केला.

विद्यार्थ्यांच्या यशामागे संस्थेचे दूरदर्शी नेतृत्व, शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, विद्यार्थ्यांची मेहनत आणि पालकांचे सहकार्य महत्त्वपूर्ण ठरल्याची भावना विद्यालय प्रशासनाने व्यक्त केली. शैक्षणिक गुणवत्तेसोबतच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्याच्या विद्यालयाच्या धोरणाचे हे यश फलित असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

संस्थेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

> मेहनत, जिद्द आणि योग्य मार्गदर्शन यांच्या बळावर यशाचे शिखर गाठता येते, हे मुळा व्हॅली पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा आपल्या यशातून सिद्ध करून दाखविले आहे.
> – प्रा. संतोष माने

# संत तुकाराम विद्यालयाचा ९३.३३ टक्के निकाल

## समृद्धी वाळके विद्यालयात प्रथम; विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**बारागाव नांदूर**
सार्व मंथन । प्रतिनिधी

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ अंतर्गत असलेल्या संत तुकाराम विद्यालय येथील इयत्ता दहावी (एस.एस.सी.) परीक्षेचा सन २०२६ चा निकाल ९३.३३ टक्के लागला असून विद्यालयाने गुणवत्तेची उज्वल परंपरा कायम राखली आहे. विद्यार्थ्यांच्या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यंदाच्या परीक्षेसाठी विद्यालयातून एकूण ६० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ५६ विद्यार्थी यशस्वी झाले असून विद्यालयाचा एकूण निकाल ९३.३३ टक्के लागला. विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या नावलौकिकात भर घातली आहे.

विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये कु. समृद्धी संजय वाळके हिने ४६८ गुण मिळवत ९३.६० टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. कु. ज्ञानेश्वरी शंकर घोडके हिने ४६१ गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर चि. उद्य सुनिल पेरणे याने ४५७ गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला.

या यशाबद्दल मुख्याध्यापक प्रकाश तारडे, पर्यवेक्षक नंदकुमार हापसे तसेच दहावीला अध्यापन करणारे सर्व शिक्षक उषा पोटे, गणेश चोथे, राम कवाणे, सोनाली शेलार, राखी शिरसाट, मंदा तांबे, विनोद कोरडे, प्रकाश राजुळे, किशोर निरगुरकर आणि आठभाई मच्छिंद्र यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

विद्यालयाच्या या यशाबद्दल डॉ. बाबुराव बापूजी तनपुरे सहकारी साखर कारखान्याचे विद्यमान संचालक गणेशभाऊ गाडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विश्वास तात्या पवार, तंटामुक्ती अध्यक्ष शिवाजीराजे पवार, सरपंच प्रभाकरराव गाडे, धनंजय शिवाजीराजे गाडे, पत्रकार रफिकभाई, वसंतराव पाटील गाडे, जालिंदर पाटील गाडे, बाळासाहेब गाडे, पंढरीनाथ पाटील पवार, शिवाजी सजन कोहकडे, संभाजीराजे गाडे, नितीन कुमार गाडे, कुलदीप पवार, पीरखाँ पठाण, दत्तात्रय आरगडे, ग्रामसेवक भारत जाधव, लक्ष्मण पाटील गाडे, नवाज देशमुख, किशोर पाटील कोहकडे, अर्जुनराव गाडे सर, शिवा आप्पासाहेब गाडे आणि हमीदभाई यांनी मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# बँकेवरील दरोड्याचा प्रयत्न फसला

## लोखंडी दरवाज्याचे कुलूप तोडण्यात अपयश

**पारनेर**
सार्व मंथन । प्रतिनिधी

जवळे परिसरात चोरट्यांनी मोठा धुमाकूळ घातला असून, काल गुरूवारी पहाटेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी जवळे ग्रामपंचायत चौकातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे शाखा कार्यालय फोडण्याचा धाडसी पण अयशस्वी प्रयत्न केला. बँकेच्या लोखंडी दरवाज्याचे कुलूप तोडण्यात अपयश आल्यानंतर, या चोरट्यांनी मोर्चा जवळे येथील माळवाडीकडे वळवत तेथे झोपलेल्या एका महिला शेतमजुराच्या गळ्यातील सुमारे एक तोळ्याचे सोन्याचे गंठण ओरबाडून नेले. चोरट्यांच्या प्रयत्नांमुळे परिसरात भीतीचे सावट निर्माण झाले असून, पारनेर चे पोलीस निरीक्षक संतोष खेडकर यांच्या नेतृत्वाखालील पोलीसांच्या कामगिरीवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

काल गुरूवारी पहाटे ३ . ४५ वाजण्याच्या सुमारास जवळे येथील मुख्य चौकात असलेल्या जिल्हा बँकेच्या शाखेच्या लोखंडी दरवाज्याचे कुलूप तोडत धाडसी चोरी करण्याचा प्रयत्न केला. मात्र ते तुटले नाही. त्याच वेळी रस्त्यावरून जाणाऱ्या एका वाहनाचा उजेड पडल्यामुळे चोरट्यांनी तेथून पलायन करत पळ काढला. हा संपूर्ण घटना क्रम बँकेच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात बंदिस्त झाला आहे.

बँकेतील चोरीचा प्रयत्न अयशस्वी झाल्याने ते चोरटे रिकाम्या हाती परतत असताना त्यांनी जवळच असलेल्या माळवाडी कडे लक्ष वळवले. सध्या सुरू असलेल्या प्रचंड उन्हाळ्याच्या गरमीमुळे कामानिमित्त बाहेरून आलेले ९ ते १० शेतमजूर घराबाहेर झोपले होते. गाढ झोपेत असलेल्या एका महिलेच्या गळ्यातील एका तोळ्याचे सोन्याचे गंठण चोरट्यांनी लांबवले. हिसका बसताच संबंधित महिला व इतर मजूर जागे झाले. त्यांनी आरडाओरडा करत चोरट्यांचा पाठलाग करत पकडण्याचा प्रयत्न केला , परंतु अंधाराचा आणि झाडीझुडपांचा फायदा घेत चोरटे पसार होण्यात यशस्वी झाले.

जवळे ग्रामस्थांच्या मते, हे भुरटे चोरटे याच भागातील असावेत. त्यांच्याकडे कोणतेही घातक हत्यार असल्याचे कमेऱ्यात दिसून आले नाही. पण भर चौकातील बँकेची शाखा फोडण्याचा प्रयत्न झाल्याने जवळे येथील व्यापारी व ग्रामस्थांमध्ये भीतीचे सावट पसरले आहे. यापूर्वीही जवळे , निघोज , वडझिरे परिसरात शेतकऱ्यांच्या विहिरींवरील विद्युत मोटारी, केबल आणि शेतीचे साहित्य चोरीला जाण्याच्या घटना वारंवार घडल्या आहेत. वाढत्या चोऱ्यांमुळे सर्वसामान्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असून, रात्रीच्या वेळी पारनेर पोलीसांची गस्त वाढवावी , जेणेकरून या भुरट्या चोरांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी ही मोठ्या प्रमाणावर करण्यात येत आहे .

# आरडा ओरड करण्यास विरोध केल्याने तरुणाला लाकडी काठी व गजाने मारहाण

**टाकळीमिया**
सार्व मंथन । प्रतिनिधी

पहाटेच्या सुमारास रस्त्यावर आरडा ओरडा करुन भांडण करण्यास विरोध केल्याने किरण देशमुख यांना शिवीगाळ करुन लाकडी काठी, लोखंडी गज व लाथा बूक्क्यांनी मारहाण केल्याची घटना राहुरी तालुक्यातील टाकळीमियाँ एप्रिल रोजी पहाटेच्या सुमारास घडली.

किरण बाबासाहेब देशमुख, वय ५२ वर्षे, रा. टाकळीमीया, देशमुख वस्ती, ता. राहुरी, हे दि. २५ एप्रिल २०२६ रोजी पहाटे १ वाजेच्या सुमारास घरामध्ये झोपलेले असताना त्यांच्या घरासमोरील रोडवर काही लोक मोठ मोठ्याने शिवीगाळ करण्याचा मला आवाज आला. तेव्हा किरण देशमुख हे उठून घराबाहेर गेले आणि म्हणाले कि, येथे मोठ मोठ्याने शिवीगाळ करु नका. असे म्हणाल्याचा आरोपींना राग आल्याने त्यांनी किरण देशमुख यांना शिवीगाळ करुन लाकडी काठी, लोखंडी गज व लाथा बूक्क्यांनी मारहाण केली. आणि त्यांच्या खिशातील ९ हजार ५०० रुपए रोख रक्कम काढून घेतली. तसेच तुझ्यावर खोटा गुन्हा दाखल करतो, असे म्हणून जिवे मारण्याची धमकी दिली.

किरण बाबासाहेब देशमुख यांच्या फिर्यादीवरून आरोपी दिपक भाऊसाहेब शिंदे, रा. शिंदे वस्ती देवळाली शिव, टाळीमीया, शुभम खांदे, रा. काळामाथा जातप, ता. राहुरी व तीन अनोळखी इसम अशा एकुण पाच जणांवर गुन्हा रजि. नं. ४५३/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ११५ (२), ११८ (१), ११९ (१), १८९ (२), १९०, १९१ (२), ३५१ (२), ३५२ प्रमाणे मारहाण व धमकीचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस करत सुरु आहे.

# पाणी सोडा, नाहीतर आंदोलन उभं करणार

## आमदार हेमंत ओगले यांची विखे पाटलांकडे मागणी

**श्रीरामपूर**
सार्व मंथन । प्रतिनिधी

पाणी सोडा, नाहीतर आंदोलन श्रीरामपूर–राहुरी विधानसभा मतदारसंघात पाण्याचा प्रश्न पुन्हा एकदा पेटला असून, खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. टंचाई आढावा बैठकीत शेतकऱ्यांनी कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, गावतळी आणि पाझर तलाव तातडीने भरून घेण्याची मागणी करत प्रशासनाला थेट इशारा दिला.

या पार्श्वभूमीवर मतदारसंघाचे आमदार हेमंत ओगले यांनीही पुढाकार घेत राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे थेट मागणी केली आहे. संबंधित यंत्रणेला तात्काळ पाणी सोडण्याचे आदेश देऊन कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, गावतळी आणि पाझर तलाव भरून घेण्याबाबत कार्यवाही करावी, असे पत्र आमदार ओगले यांनी दिले आहे.

गोदावरी, प्रवरा आणि मुळा नद्यांवरील कोल्हापूर बंधारे हे शेतकऱ्यांसाठी जीवनदायी ठरत असले तरी सध्या पाण्याअभावी खरीप हंगाम धोक्यात येण्याची चिन्हे दिसत आहेत. टाकळीभान आणि मुसळवाडी येथील टेलटँकसह परिसरातील जलसाठे भरल्यास हजारो हेक्टर शेतीला दिलासा मिळणार असल्याचे शेतकऱ्यांनी स्पष्ट केले.

बैठकीदरम्यान शेतकऱ्यांनी प्रशासनाच्या कामकाजावर जोरदार टीका करत ''दरवर्षी टंचाई, पण उपाय नाही'' अशी नाराजी व्यक्त केली. काही शेतकऱ्यांनी तर ''पाणी वेळेत मिळाले नाही तर रस्त्यावर उतरून आंदोलन करू,'' असा इशाराही दिला.

# रखडलेल्या कामांबाबत योग्य निर्णय घेतले जातील

## सभापती राम शिंदे; राष्ट्रीय महामार्गाच्या रखडलेल्या कामाच्या संदर्भात बैठक

**जामखेड**
सार्व मंथन । प्रतिनिधी

जामखेड शहरातुन जाणाऱ्या व रखडलेल्या राष्ट्रीय महामार्गाचे सर्व काम नियमानुसारच होईल. कुणाचीही गय केली जाणार नाही. नागरिकांच्या हिताला प्राधान्य देत अतिक्रमण व रखडलेल्या कामांबाबत योग्य निर्णय घेतले जातील, असे स्पष्ट मत सभापती प्रा. राम शिंदे यांनी व्यक्त केले.

जामखेड शहरातील अतिक्रमण तसेच राष्ट्रीय महामार्गाच्या रखडलेल्या कामाच्या संदर्भात शासकीय विश्राम गृह, अहिल्यानगर येथे विधान परिषदेचे सभापती राम शिंदे व जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्या उपस्थितीत नुकतीच महत्त्वपूर्ण बैठक पार पडली यावेळी सभापती प्रा. राम शिंदे हे बोलत होते.

अहिल्यानगर येथे शासकीय विश्रामगृह या ठिकाणी ही बैठक संपन्न झाली. या बैठकीत जामखेड शहरातील अतिक्रमण, वाहतूक कोंडी तसेच राष्ट्रीय महामार्गाच्या रखडलेल्या कामाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी सभापती प्रा. राम शिंदे यांनी संबंधित कामांचा आढावा घेत केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधला. त्यांनी महामार्गाच्या कामातील दिरंगाई तसेच संबंधित अधिकाऱ्यांकडून चुकीच्या पद्धतीने होत असलेल्या कामकाजाबाबत नाराजी व्यक्त केली. त्यावर केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयाने जामखेड शहरातील राष्ट्रीय महामार्गासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना तात्काळ अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. तसेच सभापती शिंदे यांनी राष्ट्रीय महामार्गाशी संबंधित सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेण्याच्या सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या.




यावेळी सामाजिक कार्यकर्ते अवधुत पवार, नगराध्यक्ष अमित चिंतामणी, उपनगराध्यक्ष पोपट नाना राळेभात, काँग्रेसचे सरचिटणीस राहुल उगले, नगरसेवक संजय काशिद, पवन राळेभात, तात्याराम पोकळे, मार्केट कमिटीचे सभापती शरद कार्ले, संचालक सचिन घुमरे आदी उपस्थित होते.




सायं. दैनिक
# सार्व मंथन
नवी दिशा, नवी आशा
शनिवार, दि. ०९ मे २०२६ पान ०४




## नगराध्यक्ष कदम आणि आप्पासाहेब ढूस यांच्या जवळकीने
# देवळालीतील राजकारण बदलाचे संकेत?

**छ.संभाजीनगर**
**सार्व मंथन । प्रतिनिधी**

देवळाली प्रवरा येथील आंतरराष्ट्रीय खेळाडू तथा प्रहारचे जिल्हा उपाध्यक्ष आप्पासाहेब ढूस यांचे चि. प्रसाद यांच्या छत्रपती संभाजीनगर येथे ०७ मे रोजी सायंकाळी पार पडलेल्या शाही विवाह सोहळ्यास देवळाली प्रवरा नगरपरिषदेचे नगराध्यक्ष सत्यजित चंद्रशेखर कदम यांच्या उपस्थितीने शहरात चर्चेला उधाण आले आहे.

या विवाह सोहळ्यास संत महंतांसह आप्पासाहेब ढूस यांच्यावर प्रेम करणारे अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध राजकीय पक्षांचे जिल्हा प्रमुखांसह, पदाधिकारी व प्रमुख नेत्यांनी भेटी देऊन चिरंजीव प्रसाद आणि चि.सौ. का. पूजा यांना शुभाशीर्वाद दिले. तसेच आवाज महाराष्ट्राचा फेम अंतः अस्ति प्रारंभ चे लेखक वैभव ढूस यांचे राज्यभरातून आलेले नामांकित रिल स्टार व सुप्रसिद्ध व्यक्तिमत्व मित्र परिवार तसेच देवळाली प्रवरा नगरपरिषदेचे

नगराध्यक्ष सत्यजित कदम यांचेसह सर्व सत्ताधारी व विरोधी गटाचे आजी माजी नगरसेवक, डॉ तनपुरे सह साखर कारखान्याचे आजी माजी संचालक, देवळाली सोसायटीचे सर्व आजी माजी चेअरमन आणि संचालक, जिल्ह्यातील विविध संस्थांचे चेअरमन व संचालक, विविध विभागातील अधिकारी तसेच नगरपरिषद कर्मचारी आदींसह हजारोंच्या संख्येने वधू वराकडील मान्यवरांच्या उपस्थितीत हा शाही विवाह सोहळा संपन्न झाला.

देवळाली प्रवरा शहराच्या राजकारणात नगराध्यक्ष सत्यजित कदम आणि आप्पासाहेब ढूस यांना एकमेकांचे कट्टर विरोधक म्हणून ओळखले जात असताना सत्यजित कदम यांनी त्यांच्या सर्व सत्ताधारी नगरसेवकांसह या विवाह सोहळ्याला लावलेल्या हजेरीमुळे शहरात चर्चेला उधाण आले असून त्यामुळे देवळाली प्रवरा शहरातील राजकारण बदलाचे हे संकेत असल्याचे बोलले जात आहे.

देवळाली प्रवरा शहरात आप्पासाहेब ढूस यांचे नातेवाईक, सोयरे धायरे यांचे मोठे जाळे आहे. देवळाली प्रवरा नगरपरिषदेमध्ये आप्पासाहेब ढूस यांच्या सुनबाई पल्लवी वैभव ढूस या सध्या नगरपरिषदेच्या विद्यमान नगरसेविका असून वडील स्व . भिमराज रामजी ढूस हे राहुरी कारखान्याचे संचालक राहिलेले आहेत. तसेच मातोश्री स्व. चांगूणाबाई भिमराज ढूस व चुलते विठ्ठल रामजी ढूस हे देवळाली प्रवरा सोसायटीचे संचालक राहिलेले असून बंधू राजेंद्र विठ्ठल ढूस हे देवळाली प्रवरा सोसायटीचे दोनदा



चेअरमन राहिले असल्याने देवळाली प्रवरा सोसायटीच्या राजकारणामध्ये आप्पासाहेब भिमराज ढूस यांच्या परिवाराला विशेष महत्त्व आहे.

लवकरच देवळाली प्रवरा सोसायटीची निवडणूक होऊ घातली आहे . त्यामुळे नगराध्यक्ष सत्यजित पाटील कदम यांच्या ढूस परिवारातील या विवाह सोहळ्यास लावलेली उपस्थिती विशेष महत्त्वाची मानली जात आहे.

सत्यजित कदम यांच्या या विवाह सोहळ्यास लावलेल्या उपस्थितीमुळे देवळाली प्रवरा शहरात विविध चर्चांना उधाण आले असून देवळाली प्रवरा सोसायटीच्या पुढील निवडणुकीची ही मोर्चे बांधणी तर नाहीना अशी शंका त्यामुळे विरोधकांमध्ये घेतली जात आहे.

नगराध्यक्ष सत्यजित कदम आणि आप्पासाहेब ढूस यांची या विवाहाच्या निमित्ताने दिसून आलेली जवळीक देवळालीच्या पुढील राजकारण बदलाचे संकेत आहेत की काय हे येत्या काळात शहराला लवकरच पाहायला मिळणार आहे. आणि तसे झाले तर दोन कट्टर विरोधक एकत्र आल्याने नक्कीच देवळाली प्रवरा शहराच्या विकासाला चालना मिळेल यात शंकाच नाही.

---

## मंथन फटकारे

**अनुसंगम तथा बाळासाहेब शिंदे**
**मो. ९५०३९५९९५७**

तहसीलदाराला जेसीबीने चार किलोमीटर फरफटत नेले-वृत्त

**- त्या गुन्हेगारावर नक्कीच अडचण होणार? पण कारवाई करण्यासाठी मुख्य अडचण अशी आहे. त्या तहसीलदार साहेबांचे नाव आहे 'बुद्धभूषण'! कारवाई होईल?**

भुसंपादन घोटाळ्यात बीडचा माजी जिल्हाधिकारी अविनाश पाठक अटकेत-वृत्त

**- बीडचा 'बिहार' कधी झाला? हे सर्वसामान्य लोकांना कधी कळलेच नाही! राजकारणी, अधिकारी, गुंडानी नुसता 'हैदोस' घातलाय? पाठक ला चिंता नाही...?**

शिक्षकांना पन्नास दिवसांचे प्रशिक्षण अनिवार्य-वृत्त

**- प्रशिक्षण, अहवाल, इतर कामे चालूच आहेत! शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवायचे कधी? जाऊद्या, सरकारी शाळेत कुठं 'मोठ्यांची' मुलं शिकतात?**

देशात सर्वाधिक क्राईम नागपूरमध्ये-वृत्त

**- गृहमंत्री नागपूरचा असल्याने तेथील क्रिमिनल ॲक्टिव्ह झाले कि काय? का नविन तयार झालेत?**

जनगणनेणे देशाचे चित्र स्पष्ट होणार-हजारे

**- देशासामोरीन सरकार बदलल्या पासुन तुमचेच चित्र दिसेनासे झालंय, त्याच काय? ते कधी स्पष्ट होणार?**

---

# सोनाराला कोतवाली पोलीस ठाण्यात अमानुषपणे मारहाण

## राहुरी पोलीस व महसूल प्रशासनाला सराफ संघटनेचे निवेदन

**राहुरी**
**सार्व मंथन । प्रतिनिधी**

अहिल्यानगर येथील कोतवाली पोलिस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रिकव्हरी म्हणून एका सराफ व्यापाऱ्याकडून २०० ग्रॅम सोने घेतले. याची विचारणा करण्यासाठी गेलेल्या लोकांना पोलीसांकडून बेदम मारहाण करण्यात आली. ही घटना अतिशय निंदनीय असून या घटनेचा आम्ही निषेध व्यक्त अशी प्रतिक्रिया संजीव उदावंत यांनी दिली.

नगर जिल्ह्यातील सराफांना नगर कोतवाली पोलीस स्टेशन येथील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या अमानुष मारहाणीच्या निषेधार्थ राहुरी येथील सराफ व्यावसायिकांच्या



वतीने दि. ८ मे २०२६ रोजी दुकाने बंद ठेवण्यात आली. यावेळी संजीव उदावंत यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. सर्व सराफ व्यावसायिकांच्या वतीने पोलिस निरीक्षक संजय ठेंगे व महसूल प्रशासनाला निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे कि, सुवर्ण समाजातील संजय बुऱ्हाडे, रा. सोनई, संकेत बुऱ्हाडे आणि भागवत अधापुरे यांना कोतवाली पोलिस स्टेशन अहिल्यानगर येथे दि. १६ एप्रिल २०२६ रोजी कलम ४११ अंतर्गत चौकशीसाठी ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांना अत्यंत अमानुष पध्दतीने मारहाण केली. सदर पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. असे निवेदनात म्हटले आहे.

दिलेल्या निवेदनावर सराफ संघटनेचे अध्यक्ष रविंद्र उदावंत, सचिन डहाळे, महेश उदावंत, सौरभ भन्साळी, विलास आधापूरे, दिपक नागरे, रोहित आंबीलवादे, अक्षय उदावंत, सिद्धेश भडकवाल, व्ही. जी. उदावंत, कृष्णा उदावंत, गणेश भडकवाल, सचिन मुंडलीक, राजेंद्र दहिवाळ, दिलीप शहाणे, सतिष शहाणे, मनोज आंबिलवादे, श्याम शहाणे, ओंकार भडकवाल, राजेंद्र मुंडलीक, प्रशांत नहार, दादासाहेब भडकवाल, संतोष नागरे, राजेश मैड, विनोद वर्मा, सागर लोळगे, कृष्णा मुंडलीक, भास्कर उदावंत आदिंच्या सह्या आहेत.

संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांवर नव्याने रुजू झालेल्या पोलीस अधीक्षकांनी कारवाई करावी व सराफ व्यावसायिकांना न्याय द्यावा अशी मागणी सराफ व्यावसायिकांकडून करण्यात येत आली आहे.

---

# गर्भलिंग निदान प्रकरणातील आरोपींना १० मेपर्यंत कोठडी

**श्रीरामपूर**
**सार्व मंथन । प्रतिनिधी**

लोणी परिसरात उघडकीस आलेल्या बेकायदा गर्भलिंग निदान प्रकरणाचा तपास अधिक गडद होत असून, या रॅकेटमागे राज्यव्यापी साखळी कार्यरत असल्याचा संशय बळावला आहे. या प्रकरणातील आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले असता पोलिसांनी वाढीव पोलीस कोठडीची मागणी केली. त्यानुसार न्यायालयाने आरोपींना १० मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

आतापर्यंतच्या तपासात या प्रकरणात एकूण १२ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यामध्ये दोन डॉक्टर, चार एजंट आणि सहा गर्भवती महिलांचे पती यांचा समावेश आहे. श्रीरामपूर येथील डॉ. कुटे बेकायदेशीर गर्भपात प्रकरणी अटक करण्यात आल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

तपासादरम्यान आणखी दोन आरोपींची नावे पुढे आली असून हे दोघे पुणे येथील असल्याचे निष्पन्न झाले आहे. नेवासा येथील डॉ. भणगे आणि प्रदीप ढगे यांनी गर्भलिंग निदानासाठी वापरले जाणारे सोनोग्राफी मशीन याच आरोपींकडून खरेदी केल्याचे तपासात उघड झाले आहे. संबंधित आरोपींना लवकरच ताब्यात घेऊन चौकशी करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

याशिवाय, ज्या गर्भवती महिलांचे बेकायदेशीर लिंगनिदान करण्यात आले, त्यांची ओळख पटवून जबाब नोंदविण्याचे काम सुरू आहे. काही महिलांचे जबाब नोंदविण्यात आले असून त्यापैकी तिघींचे गर्भपात करण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. हे गर्भपात अटक आरोपींच्या दवाखान्यांत एजंटांच्या मदतीने करण्यात आल्याचे तपासातून समोर आले आहे.

दरम्यान, या रॅकेटचे धागेदोरे जिल्ह्याबाहेरही पसरले आहेत का? याचाही तपास सुरू असून आणखी काही डॉक्टर, एजंट आणि संबंधित व्यक्तींवर कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

एजंट आठ ते दहा गर्भवती महिलांचा गट तयार करत होते. ठरावीक दिवस व वेळ निश्चित करून महिलांना पती किंवा नातेवाईकांसह बोलावले जात होते. महिलांचे नातेवाईक एका ठिकाणी थांबवून एजंट महिलांना चारचाकी वाहनातून अज्ञातस्थळी नेत होते. तेथे सोनोग्राफीद्वारे गर्भलिंग निदान केले जात होते. तपासणीनंतर महिलांना पुन्हा मूळ ठिकाणी आणून सोडले जात होते. एका गर्भलिंग निदानासाठी डॉक्टरला सुमारे १० हजार रुपये मिळत होते. एजंटांना प्रत्येकी तीन हजार रुपयांपर्यंत कमिशन दिले जात होते. एकापेक्षा अधिक एजंट सहभागी असल्यास रकमेची मागणी वाढवली जात होती.

---

## 'सोनई मुतारी नसलेले गाव'

सार्व मंथन सोनई । सोनई सारख्या मोठी बाजारपेठ असलेल्या सोनई गावात लघुशंका नसल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त करून संताप व्यक्त केला आहे. सोनई हे 'मुतारी नसलेले गाव' असल्यामुळे नागरिक कुठेही लघुशंका करत आहे, येणाऱ्या जाणाऱ्या महिलांना लाजस्पद होऊन त्रासदायक चित्र दिसत आहे. परिसरातुन २० किलोमीटर हुन सोनईत बहुसंख्य नागरिक, महिला खरेदीसाठी येत असतात, नेहमी गर्दी असते, परंतु लघुशंकसाठी अत्यन्त त्रासदायक गैरसोय असून योग्य जागा उपलब्ध करून सोनई गावातील लघुशंकची समस्या ग्रामपंचायतिने सोडवावी अशी मागणी प्रगतशील शेतकरी जालिंदर येळवंडे व सेवानिवृत्त पोलीस अधिकारी शरद लिपाने यांनी केली आहे.

---

# राहुरीत भरदिवसा तरुणाला दीड लाखाला लुटले

## तिघा भामट्यांनी बॅग क्षणात लंपास केली

**राहुरी**
**सार्व मंथन । प्रतिनिधी**

राहुरी शहरात भरदिवसा घडलेल्या धाडसी चोरीच्या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तालुक्यातील सडे येथील एका तरुणाची दीड लाख रुपये रोख रक्कम असलेली बॅग अज्ञात तिघा भामट्यांनी अवघ्या काही क्षणांत लंपास केल्याची घटना शुक्रवारी (दि. ८) दुपारी शुक्लेश्वर चौक परिसरात घडली.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, ओमप्रकाश भाऊसाहेब पानसंबळ (वय २६, रा. सडे, ता. राहुरी) यांनी राहुरी शहरातील महाराष्ट्र बँकेतून दुपारी सुमारे १२ वाजता दीड लाख रुपये काढले होते. ही रक्कम त्यांनी एका पिशवीत ठेवून मोटारसायकलच्या हँडलला अडकवली होती. पैसे घेऊन ते घरी जात असताना शुक्लेश्वर चौक परिसरात त्यांच्या खिशातून काहीतरी पडल्याचा भास झाला. त्यामुळे त्यांनी मोटारसायकल थांबवून मागे जाऊन पाहणी सुरू केली.

याच क्षणाची संधी साधत त्यांच्या हालचालींवर पाळत ठेवून असलेल्या तिघा भामट्यांनी मोटारसायकलवरील पैशांची पिशवी चोरून नगर-मनमाड मार्गाच्या दिशेने धूम ठोकली. प्रकार लक्षात येताच पानसंबळ यांनी आरडाओरडा करत आरोपींचा पाठलाग केला. मात्र आरोपी काही क्षणांतच मोटारसायकलवरून पसार झाले.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली असून आरोपींचा शोध सुरू आहे. उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---


# अंबिका विद्यालयाचा दहावीचा ९८.३३ टक्के निकाल


## कार्तिकी सोनवणे मानोरी केंद्रात प्रथम; अंबिका विद्यालय 'शिवाजी' संस्थेमध्ये द्वितीय

**मानोरी**
**सार्व मंथन । प्रतिनिधी**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित अंबिका माध्यमिक विद्यालय, मानोरी येथील इयत्ता दहावीचा सन २०२५-२६ चा निकाल ९८.३३ टक्के लागला असून विद्यालयाने गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा यंदाही कायम राखली आहे. विशेष म्हणजे अंबिका माध्यमिक विद्यालयाने संस्थेमध्ये द्वितीय क्रमांक पटकावून आणखी एक मानाचा बहुमान मिळविला आहे. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादन करत शैक्षणिक क्षेत्रात मानोरी परिसराचा नावलौकिक वाढविला आहे.

यावर्षी दहावीच्या परीक्षेस विद्यालयातील एकूण ६० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ५९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यालयाचा निकाल ९८.३३ टक्के इतका लागला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे विद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.





विद्यालयातील कु. कार्तिकी संतोष सोनवणे हिने ५०० पैकी ४४८ गुण मिळवत ९०.२९ टक्के गुणांसह विद्यालयात प्रथम क्रमांक पटकाविला. विशेष म्हणजे तिने मानोरी केंद्रात प्रथम तर संस्थेमध्ये द्वितीय क्रमांक मिळवत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. कु. वैष्णवी शिवनाथ डमाळे हिने ४३४ गुणांसह ८७.४० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला, तर चि. आयान सलीम शेख याने ४०० गुणांसह ८० टक्के गुण प्राप्त करून तृतीय क्रमांक संपादन केला.

निकालामध्ये डिस्टिंक्शनमध्ये ५ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत २५ विद्यार्थी, द्वितीय श्रेणीत २१ विद्यार्थी तसेच पास क्लासमध्ये ८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशामागे शिक्षकांचे नियोजनबद्ध मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत कारणीभूत असल्याची भावना विद्यालय प्रशासनाने व्यक्त केली.

या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक नवनाथ महापुडे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी, पालक तसेच शिक्षकवृंदाचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी भविष्यातही याच जिद्दीने आणि आत्मविश्वासाने प्रगती करत विद्यालयाचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छाही त्यांनी दिल्या.

विद्यालयाच्या यशामध्ये शिक्षक बाबासाहेब विधाटे, गणेश म्हसे, प्रकाश तांबे, मच्छिंद्र शिरसाट, ऋषिकेश लांबे, गोरक्षनाथ घुमे, सिद्धार्थ नाईक, शिवनाथ डमाळे तसेच शिक्षिका शितल वाकचौरे, मंदाकिनी बडे, किरण तावरे, छाया काळे, उषा खोबरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच शिपाई जगधने व देवरे यांनीही विद्यालयीन कामकाजात सहकार्य केले.

विद्यालयाच्या सातत्यपूर्ण यशामुळे मानोरी परिसरातील पालक, ग्रामस्थ व माजी विद्यार्थ्यांकडून विद्यालयाचे कौतुक होत असून यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

---

# पसायदान आनंदवन सेवाभावी संस्थेचे पुरस्कार जाहीर


पंढरीनाथ महाराज तांदळे


शिवाजीराव कपाळे


डॉ. संजय सोनवणे


सूर्यकांत नेटके

**सोनई**
**सार्व मंथन । प्रतिनिधी**

पसायदान आनंदवन सेवाभावी संस्थेच्या वर्धापनदिनानिमित्त देण्यात येणारे 'पसायदान' पुरस्कार पंढरीनाथ महाराज वारकरी संस्थेचे पंढरीनाथ महाराज तांदळे, आरोग्य विषयी जागतिक स्तरावर कार्य असलेले डॉ. संजय सोनवणे, साई आदर्श संस्थेचे संस्थापक शिवाजीराव कपाळे यांना जाहीर करण्यात आला आहे.

जिल्हा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष स्व. सोपानराव दरंदले यांची स्मृती जागृत रहावी म्हणून सुरु करण्यात आलेला दुसरा 'पत्रकार रत्न पुरस्कार' दैनिक ॲग्रोवनचे जिल्हा प्रतिनिधी सूर्यकांत नेटके यांना देण्यात येणार आहे अशी माहिती संस्थेचे सचिव संजय गर्जे व गोविंद महाराज निमसे यांनी दिली.

ध्यानमंदीर प्रांगणात सायंकाळी ६ वाजता नेवासा येथील सद्गुरु नारायणगिरी महाराज आश्रमाचे प्रमुख महंत उध्दव महाराज मंडलिक व शनैश्वर देवस्थान ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी अतुल चोरमारे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार आहे.

सायं. दैनिक सार्व मंथन नवी दिशा, नवी आशा

हे पत्रक मुद्रक, मालक, प्रकाशक **अनिल गंगाधर कोळसे** यांनी यांच्या **स्वराज प्रेस ॲण्ड प्रिटींग येथे ५९३, राहुरी बु।, ता. राहुरी, जि. अहमदनगर (महा) येथे छापून कोळसे दुबीचा मळा, व्यंकोबा मंदीर परिसर, राहुरी, ता. राहुरी, जि. अहमदनगर ४१३ ७०५, (महा.)** येथे प्रकाशित केले. संपादक अनिल गंगाधर कोळसे सदर अंकात प्रकाशित झालेल्या लेख बातम्यांच्या मजकूराशी संपादक सहमत असेलच असे नाही. न्यायालयीन वाद-विवाद राहुरी न्याय कक्षेअंतर्गत (खाजगी वितरणासाठी) मुद्रणीय दोष संभवणीय.
RNI No. MAHMAR/2016/72596